कायम विनाअनुदानतत्वावर

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग ( प्राथमिक) २४९
जा. क्र. जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/मै.वाढ /०६.
पुणे - १. दिनांक : १४/१०/०६.

प्रति,

मुख्याध्यापक/~~मुख्याध्यापिका~~,
जीवन विकास मंदिर
शिरूर ता. शिरूर

विषय :- मराठी माध्यमाच्या 'कायम विनाअनुदान' तत्वावरील शासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ~~जादा~~/नैसर्गिक वाढीचा/~~वाढीच्या~~ ~~प्रथम~~/~~जादा~~ ~~तुकड्या~~/वर्गउघडण्यास परवानगी देणे बाबत. (माध्यम - मराठी)

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस. १००२/ (१०००/०२)/प्राशि-३
दिनांक :- २३/ सप्टेंबर २००३

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या ~~जादा~~/नैसर्गिक वाढीचा /~~वाढीच्या~~ ~~प्रथम~~/~~जादा~~ ~~तुकड्या~~/वर्ग जुन २००६ पासुन सन २००६ - २००७ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ /जादा / नैसर्गिक तुकडी वाढ | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | जीवन विकास मंदिर शिरूर ता. शिरूर | मराठी | ७वी | नैसर्गिक वाढ | मंजूर |

प्रथम तुकडी

अटी व शर्ती :-

१) शाळेस शासनाने वेळोवेळी विहीत केल्या नुसार शैक्षणिक व व्यवसायीक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहुन नेमला पाहिजे.
२) सदर शाळेने तुकडया साठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहीजे.
३) सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.
५) सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८) पट व उपस्थिती वाढविण्याचे अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

(सही)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे करिता

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१) प्रशासन अधिकारी/~~म.शि.अ~~ न.पा. शिक्षण मंडळ शिरूर
२) सचिव /अध्यक्ष, कृषीलोक विकास संशोधन संस्था शिरूर